MHAU060006602022

<u>**नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०२२ मधील नि.क्र. २७ खालील आदेश**</u>

<u>**छायाबाई धोतरे व इतर वि. साहेबराव दापके**</u>

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये नि. २७ कडील अर्ज प्रतिदावा/काऊन्टर क्लेम व तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जात दुरुस्ती करण्याची परवाणगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीचे कथन की, सदरील प्रतिदावा व तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज दाखल करत असताना घाई गडबड मध्ये दावा मिळकत व विनंती सदरामध्ये पुर्वेस, पश्चिमेस व उत्तरेस काऊन्टर क्लेमन्ट यांच्या ताब्यातील याच गटातील क्षेत्र असे नमुद करण्यात आलेले आहे. त्या काऊन्टर क्लेमन्ट ऐवजी प्रतिवादी असे नमुद करणे आवश्यक होते. विनंती सदरामध्ये गट नं. ४२१ एकुण क्षेत्र चे पुढे फक्त हेक्टर असे नमुद केले त्या क्षेत्र या शब्दाचे पुढे ४ असा अंक नमुद करणे राहुन गेले. सदरील चुक हि टंकलेखकाच्या चुकीमुळे वाचण्यात नजर चुकीने झालेली आहे. ज्यामध्ये पुर्वेस, पश्चिमेश व उत्तरेस काऊन्टर क्लेमन्ट ऐवजी प्रतिवादी यांच्या ताब्यातील याच गटातील क्षेत्र, असे नमुद करणे आवश्यक आहे. सदरील चुक ही नजर चुकीने घाई गडबड मध्ये टंकलिखीत झालेले आहे. सबब, प्रतिवादी यांनी सदरची दुरुस्ती करण्याची परवानगी मागितलेली आहे.

२. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, सदरचा अर्ज हा कायदेशीर नसून सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादींच्या कथानांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४.    प्रतिवादी यांनी नि. १४ कडे वादी यांच्या विरुध्द प्रतिदावा व नि. १६ कडे वादी यांच्या विरुध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळणेचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी सदर अर्जात "पुर्वेस, पश्चिमेश व उत्तरेस काऊन्टर क्लेमन्ट" ऐवजी "प्रतिवादी यांच्या ताब्यातील याच गटातील क्षेत्र" तसेच दाव्याच्या विनंती सदरामध्ये गट नं. ४२१ एकुण क्षेत्र चे पुढे फक्त हेक्टर असे नमुद केले त्या क्षेत्र या शब्दाचे पुढे ४ असा अंक नमुद करणेची दुरुस्ती मागितलेली आहे. सदरील दुरुस्ती ही प्रथमदर्शनी टंकलिखीत दुरुस्ती दिसून येते. सदर दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास सदर दाव्यातील वादीचे व प्रतिदाव्यातील प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. करिता मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिदाव्यातील वादीचा निशाणी क्र.२७ चा अर्ज प्रतीवादीस रक्कम रु. १००/- खर्च (cost) देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीने विहित दुरुस्ती मुदतीत करावी.

(खुल्या न्यायालयात घोषित)

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2023.03.28 17:53:12 +0530

कन्नड  
दिनांक : २४.०३.२०२३.

**( अ.ई. आवटी )**  
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,  
कन्नड.

# <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. आदेश या मधील सर्व मजकुर मुळ आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | **श्रीमती अ. ई. आवटी,**<br>सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),<br>तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| लघुलेखकाचे नांव | :- | -- |
| टंकलेखकाचे नांव | :- | एल.बी.आडे (कनिष्ठ लिपीक) |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | :- | २४.०३.२०२३ |
| न्यायिक अधिकाऱ्यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | २४.०३.२०२३ |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | :- | २८.०३.२०२३ |
| निकालपत्रावर डिजीटल स्वाक्षरी केलेचा दिनांक | :- | २८.०३.२०२३ |

---------------------------